**By e mail**

**प्रदीप पुरंदरे**[1] **BE (Civil), ME (WUM)**

सेवानिवृत्त सहयोगी प्राध्यापक, वाल्मी, औरंगाबाद

Flat A-1404, Vasudha Etasha,
Pune- Bangalore National Highway,
Kothrud, Pune 411038

दिनांक: ३० जानेवारी 2022

**प्रति,**

**१. मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद**

**२. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधान सभा**

**महाराष्ट्र विधान मंडळ, विधान भवन,**

बॅकबे रेक्लमेशन, विधान भवन मार्ग, मुंबई ४०००३२

**विषय: जल व सिंचन कायद्यांचे नियम न करून विधिमंडळाचा व जनतेचा अवमान करणा-यांवर कारवाई करण्याबाबत**

**संदर्भ:** १ महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरील विधान मंडळ विषयक माहितीतील प्रास्ताविक

२ प्रस्तुत पत्राच्या अखेरीस जोडलेली संदर्भांची यादी.

**महोदय,**

स.न.वि.वि.

१.० महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरील विधानमंडळ विषयक माहितीतील प्रास्ताविकाकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. त्या प्रास्ताविकानुसार कायदे करणे एवढेच विधिमंडळाचे काम नाही तर सरकारी कामकाजावर देखरेख ठेवणे व त्यात गैरप्रकार आढळल्यास त्याबद्दल जाब विचारणे ही देखील विधिमंडळाचीच कामे आहेत. या पार्श्वभूमिवर महाराष्ट्रातील सिंचन विषयक कायद्यांच्या अंमलबजावणीचा आढावा विधिमंडळाने घ्यावा आणि जल व सिंचन कायद्यांचे नियम न करून विधिमंडळाचा व जनतेचा अवमान करणा-यांवर कारवाई करावी अशी विनंती मी आपणास या पत्राद्वारे करत आहे..

२.० राज्यातील सिंचन कायद्यांच्या अंमलबजावणीकडे पराकोटीचे दुर्लक्ष झाले असल्यामुळे जलक्षेत्रात अनागोंदी व अराजक निर्माण झाले आहे. पाणी वाटपात भयावह विषमता आणि पाणी वापरात लाजीरवाणी अकार्यक्षमता ही राज्यातील सिंचनाची व्यवच्छेदक लक्षणे बनली आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे:

२.१ राज्यात जल संघर्षांची (चौकट) संख्या आणि तीव्रता सातत्याने वाढते आहे. लोकशाहीत, सांसदीय चौकटीत, शांततापूर्ण मार्गाने आणि सुसंस्कृत पद्धतीने हे संघर्ष सोडवायचे असतील आणि पाण्याचे समन्यायी वाटप व कार्यक्षम वापर व्हायचा असेल तर जलक्षेत्रात कायद्याचे राज्य आले पाहिजे.

**जल-संघर्षांची एक अपुरी यादी**

- सिंचन प्रकल्प विरुद्ध जल संधारण
- सिंचन विरूद्ध बिगर सिंचन (पिण्याचे व औद्योगीक वापराचे पाणी)
- प्रवाही सिंचन विरूद्ध उपसा सिंचन
- खालचे (निम्न) विरुद्ध वरचे (उर्ध्व) प्रकल्प
- हेड (कालव्याच्या मुखाजवळचे) विरुद्ध टेल (कालव्याच्या शेपटाकडचे)
- बारमाही पिके विरूद्ध भुसार पिके
- कालवा सिंचन विरुद्ध लाभक्षेत्रातील विहिर बागाईत

२.२ महाराष्ट्रात आज एकाच वेळी खालील नऊ सिंचन विषयक कायदे अंमलात (!) आहेत:

१) महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम (मपाअ ७६),१९७६ - संपूर्ण राज्याकरिताचा मूळ / पालक कायदा

२) पाटबंधारे विकास महामंडळांचे (पाविम) कायदे, १९९६-९८ - पाच महामंडळांकरिता प्रत्येकी एक याप्रमाणे पाच कायदे

३) महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतक-यांकडून व्यवस्थापन (मसिंपशेव्य) अधिनियम,२००५ - महाराष्ट्र जलसुधार प्रकल्पांतर्गत निवडलेल्या प्रकल्पांना व सर्व बांधकामाधीन प्रकल्पांनाच फक्त लागू

४) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण [म.ज.नि.प्रा.] अधिनियम,२००५ - महाराष्ट्र जल सुधारप्रकल्पांतर्गत निवडलेल्या प्रकल्पांना पाणी वापर हक्कांकरिता व संपूर्ण राज्याला इतर सर्व तरतुदीं करिता लागू

५) महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९[मभू(वि व व्य)] -संपूर्ण राज्याला तत्वत: लागू. पण सध्या फक्त अधिसूचित पाणलोट क्षेत्रांना लागू


२.३ सन १९७६ सालानंतर जे जे नवीन सिंचन-कायदे महाराष्ट्रात झाले (भूजल कायदा वगळता) त्यांचा मूलाधार आहे - मपाअ,७६! महाराष्ट्राचा सिंचन विषयक पालक(पेरेंट)-कायदा!! मपाअ ७६ च्या कार्यक्षम व प्रामाणिक अंमलबजावणीवर नवीन कायद्यांचे भवितव्य अवलंबून आहे. कारण राज्यातल्या सिंचन प्रकल्पांच्या व्यवस्थापनाची मूळ कायदेशीर चौकट मपाअ ७६ प्रमाणे निश्चित होणे आवश्यक आहे. कायद्याच्या अंमलबजावणीच्या तपशीलासाठी नियम तयार करणे आणि नदीनाले, लाभक्षेत्र व कालवा अधिका-यांच्या नियुक्त्या या संदर्भातील अधिसूचना काढणे हा राज्यातील सिंचन प्रकल्पांच्या एकूण सिंचन-व्यवहाराचा पाया आहे. तो किती खोल, विस्तृत व पक्का आहे हे आता राज्याच्या दूरगामी हिताकरता एकदा गांभीर्याने तपासणे गरजेचे आहे.




२.४ कायदा करणं ही एक घटना (इव्हेंट) नाही तर प्रक्रिया (प्रोसेस) असते.नुसता कायदा करून चालत नाही. कारण नुसत्या कायद्याला तसा काही अर्थ नसतो. कायदा खरंच अंमलात आणायचा असेल तर त्या कायद्याचे नियम तयार करावे लागतात. विशिष्ट अधिसूचना काढाव्या लागतात. करारनामे करावे लागतात. अधिकारी नेमून त्यांना अधिकार प्रदान करावे लागतात. विहित नमूने व नोंदवह्या उपलब्ध करून द्याव्या लागतात.कायदा व नियमांना सुसंगत असे शासन निर्णय व परिपत्रके काढावी लागतात. स्थळ, काळ, परिस्थितीनुसार कायदा व नियमात वेळीच बदल व दुरूस्त्या कराव्या लागतात. कायद्याला अभिप्रेत संस्थात्मक पुनर्रचना करून नवीन व्यासपीठं कार्यरत करावी लागतात. सिंचन कायद्यांच्याबाबतीत ही प्रक्रिया होताना  दिसत नाही.

२.५ महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतक-यांकडून व्यवस्थापन अधिनियम,२००५ या कायद्याचा अपवाद सोडला तर इतर आठ  कायद्यांना  नियम नाहीत.  कायदा (अधिनियम) सर्वसाधारण तत्वं सांगतो. कायद्यातील प्रत्येक कलम अंमलात आणण्याच्या विहित कार्यपद्धतीचा तपशील नियमात असतो. कायदा करून ४५  वर्षे झाली तरी म.पा.अ.७६चे अद्याप नियमच नाहीत. म.पा.अ.७६ मधील कलम क्र. २(२०) अन्वये "विहित" याचा अर्थ, "राज्य शासनाने या अधिनियमाखाली केलेल्या नियमाद्वारे विहित केलेले" असा आहे. म्हणजे आता कायद्याचे नियमच नसल्यामूळे काहीच विहित नाही!

२.६ म.पा.अ.७६ चे नियम नाहीत म्हणून जूने नियम वापरात आहेत. उदाहरणार्थ, मुंबई कालवे नियम-१९३४, मध्यप्रांत व व-हाड नियम-१९४९, वगैरे, वगैरे. (एकाच राज्यात दोन नियम!) जूने नियम जून्या कायद्यांवर आधारलेले आहेत. उदाहरणार्थ, मुंबई पाटबंधारे अधिनियम-१८७९,  मध्यप्रांत अधिनियम-१९३१,वगैरे, वगैरे. आणि जूने कायदे तर  म.पा.अ.७६ मधील कलम क्र. १३१ अन्वये निरसित(रिपेल) केले आहेत! कारण म.पा.अ.७६ करण्याचे उद्दिष्टच मूळी "पाटबंधारे विषयक कायद्यांचे एकीकरण करणे व त्यात सुधारणा करणे" हे होतं. मग आता कायदेशीररित्या नक्की काय झालं? एकविसाव्या शतकात "पुरोगामी" महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकातला कायदा अप्रत्यक्षरित्या वापरात आहे!




२.७ कायद्याचे नियम न करणे हा केवळ विधिमंडळाचाच नव्हे तर विधिमंडळ ज्या जनतेचे प्रतिनिधित्व करते त्या जनतेचा अवमान आहे असे प्रतिपादन माजी केंद्रिय कृषी मंत्री मा. अण्णासाहेब शिंदे यांनी माझ्या "सिंचननोंदी" (जुलै १९९२) या पुस्तकाला त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेत केले आहे.

२.८ कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या खालील प्रक्रिया कायद्याला अभिप्रेत पद्धतीने पूर्ण झालेल्या नाहीत. त्याचा तपशील परिशिष्ट १ ते ४ मध्ये दिला आहे.

१ कालवा अधिका-यांच्या नियुक्त्या करणे, त्यांचे कार्यक्षेत्र निश्चित करणे, त्यांना अधिकार प्रदान करणे आणि त्यांच्या कामाचे स्वरूप व जबाबदा-या निश्चित करणे (परिशिष्ट-१)

२ सिंचन प्रकल्पांशी संबंधित नदीनाले व लाभक्षेत्रे अधिसूचित करणे (परिशिष्टे -२,३)

३ मपाअ ७६ आणि महसूल विभागाची जबाबदारी (परिशिष्ट-४)

वरील प्रक्रिया पूर्ण केल्या आणि सिंचन विषयक कायद्यांची अंमलबजावणी झाली तर काय होऊ शकते याचा तपशील परिशिष्ट-५ मध्ये दिला आहे.
वर नमुद केलेल्या पाच परिशिष्टांचा गोषवारा या पत्रानंतर लगेच सादर केला आहे
(पहा-" महाराष्ट्रातील सिंचन विषयक कायद्यांची सद्यस्थिती -एका दृष्टिक्षेपात")

वरील प्रक्रिया पूर्ण केल्या नाहीत तर मात्र  जलसंपदा विभागाला, पाटबंधारे महामंडळांना आणि महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाला [म.ज.नि.प्रा.] कायदेशीर स्थानच (locus standi)राहत  नाही. मग सिंचन प्रकल्पांचे कायदेशीर सिंचन व्यवस्थापन करणार तरी कोण? आणि कधी? ही परिस्थिती म्हणजे कालवे फोडणा-यांकरिता, पाणी चोरणा-यांकरिता, शेतीचं पाणी पळवणा-यांकरिता आणि पाणीपट्टी बुडवणा-यांकरिता "आव जाव घर तुम्हारा" अशी आहे. काहीही करा कोणी विचारणाराच नाही!

या पार्श्वभूमिवर महाराष्ट्रातील सिंचन विषयक कायद्यांच्या अंमलबजावणीचा आढावा विधिमंडळाने घ्यावा आणि जल व सिंचन कायद्यांचे नियम न करून विधिमंडळाचा व  जनतेचा अवमान करणा-यांवर कारवाई करावी अशी विनंती मी  आपणास या पत्राद्वारे करत आहे. आपण त्याची गंभीर दखल सत्वर घ्यावी ही नम्र विनंती.

प्रस्तुत प्रकरण मार्गी लावण्यात मी काही खारीचा वाटा उचलू शकलो तर मला आनंद होईल.

धन्यवाद,

आदराने,

आपला विश्वासू,

**[प्रदीप पुरंदरे]**

**सोबत: वरील प्रमाणे**

## महाराष्ट्रातील सिंचन विषयक कायद्यांची सद्यस्थिती - एका दृष्टिक्षेपात

- जल संघर्षांच्या संख्येत आणि तीव्रतेत सातत्याने वाढ.
- सिंचन विषयक नऊ कायद्यांपैकी आठ कायद्यांना नियम नाहीत.
- राज्यातल्या सिंचन प्रकल्पांच्या व्यवस्थापनाची मूळ कायदेशीर चौकट महाराष्ट्र पाटबंधारे अधिंनियम १९७६ (म.पा.अ.७६) प्रमाणे निश्चित होणे आवश्यक
- कायद्यांचे नियम तयार करणे आणि नदीनाले, लाभक्षेत्र व कालवा अधिका-यांच्या नियुक्त्या या संदर्भातील अधिसूचना काढणे हा राज्यातील सिंचन प्रकल्पांच्या एकूण सिंचन-व्यवहाराचा पाया
- म.पा.अ.७६ चे नियम नाहीत म्हणून जूने नियम वापरात- जूने नियम जून्या कायद्यांवर आधारलेले- जूने कायदे तर निरसित(रिपेल) केलेले
- खालील प्रक्रिया अपूर्ण - कायद्याची अंमलबजावणी अशक्य
  कालवा अधिका-यांच्या नियुक्त्या करणे, त्यांचे कार्यक्षेत्र निश्चित करणे, त्यांना अधिकार प्रदान करणे आणि त्यांच्या कामाचे स्वरूप व जबाबदा-या निश्चित करणे, सिंचन प्रकल्पांशी संबंधित नदीनाले व लाभक्षेत्रे अधिसूचित करणे

- वरील प्रक्रिया पूर्ण केल्या आणि सिंचन विषयक कायद्यांची अंमलबजावणी झाली तर खालील बाबी शक्य व्हायला मदत होईल.

  - ✓ अतिक्रमण, पाणी चोरी, प्रदूषण तसेच पाणीपट्टीच्या थकबाकी बद्दल कारवाई करता येईल
  - ✓ पर्यायी व्यवस्था न करता शेतीचे पाणी बिगर सिंचनासाठी वळवण्या/ पळवण्यावर बंधने येतील
  - ✓ नदीनाल्यांच्या संभाव्य खाजगीकरणाला रोखण्याकरिता एक संदर्भ प्राप्त होईल
  - ✓ सिंचन व्यवहारास कायद्याचे अधिष्ठान प्राप्त होईल.
  - ✓ समन्यायी पाणी वाटपाच्या लढाईसाठी एक आवश्यक हत्यार मिळेल.
  - ✓ लाभक्षेत्रातील शेत जमीनी एन ए करायला आळा घालता येईल.
  - ✓ प्रवाही सिंचनाचे हितसंबंध जपायला मदत होईल.
  - ✓ शेतीचे पाणी बिगर सिंचनासाठी वळवण्या/ पळवण्यावर बंधने येतील

**कायद्याने सर्व काही होते असे नाही. पण कायद्याविना परिस्थिती अजूनच बिकट होते. कायद्याने समन्यायी पाणी वाटप चळवळीला एक आधार मिळतो!**

परिशिष्ट-१

## कालवा अधिका-यांच्या नियुक्त्या व त्यांचे अधिकार

म.पा.अ.७६ची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कालवा अधिका-यांची आहे. त्याकरता कायद्यात खालीलप्रमाणे सूस्पष्ट तरतूदी आहेत:

१. राज्यातील पाटबंधारे क्षेत्राची प्रदेश(रिजन), मंडळ(सर्कल), विभाग(डिव्हिजन), उपविभाग(सब डिव्हिजन), शाखा(सेक्शन) अशी विभागणी (व त्यात बदल) समूचित प्राधिकरणाने (म्हणजे राज्य शासनाने) कलम क्र.५ अन्वये करणे.
२. जी विभागणी केली(वा त्यात बदल)त्या संदर्भात कालवा अधिका-यांची नेमणूक कलम क्र. ८ अन्वये अधिसूचित करणे.
३. मुख्य अभियंत्यांपासून शाखाधिका-यांपर्यंत( आणि खरे तर कालवा निरीक्षक व मोजणीदारही - पहा व्याख्या २(४)/शेवटची ओळ) सर्वांची कलम क्र.६ नुसार कालवा अधिकारी म्हणून नेमणूक करणे आणि कलम क्र.२(४) अन्वये तसे आदेश काढणे.
४. कालवा अधिका-यांमध्ये कलम क्र.१० नुसार कामे वाटून देणे
५. कालवा अधिका-यांना कलम क्र. ११० अन्वये अधिकार व कर्तव्ये सोपवणे
६. मुख्य अभियंत्यांनी कलम क्र. ७ नुसार मुख्य नियंत्रक प्राधिकारी म्हणून त्यांच्या प्रदेशात सर्व अधिकार वापरणे.
७. कलम क्र. १०९ अन्वये न्यायिक प्रक्रिये अंतर्गत चौकशी करणे

कलम क्र.२(४) अन्वये कालवा अधिका-यांच्या नियुक्त्या व त्यांचे अधिकार याबाबत तपशीलवार शासन निर्णय (क्र.१०.०४/(३०९/२००४)/ सिं.व्य.(धो) दि.३१/८/२००४) असुनही त्याची अंमलबजावणी होत नाही.वर नमूद केलेल्या कलम क्र. ८,१०,११०,७ व १०९ नुसार अपेक्षित कारवाई होताना दिसत नाही. मंडळी कालवा अधिकारी म्हणून पुढाकार घेऊन कायदा राबवत नाहीत.म.पा.अ.७६ अंतर्गत विशिष्ट कलमाखाली गुन्हे नोंदवणे,प्रकरण न्यायालयात जाणे आणि न्यायालयाने काही निर्णय देणे असे काहीच होत नाही.

मपाअ ७६ हा सिंचन विषयक मूळ / पालक कायदा आहे. तो अंमलात आणण्याची जबाबदारी ज्या कालवा अधिका-यांवर आहे तेच काही करणार नसतील किंवा शासन त्यांना कामाला लावून जबाबदार धरणार नसेल तर बाकीच्या कोणत्याही सिंचन विषयक कायद्याची ख-या अर्थाने कधीच अंमलबजावणी होणार नाही कारण सर्व नवीन कायदे राबवण्याची जबाबदारी याच कालवा अधिका-यांवर आहे. ही परिस्थिती सुधारायला सुरूवात करायची असेल तर दोन गोष्टी कराव्या लागतील. एक, कायद्याच्या अंमलबजावणीबाबत कलम-७ अन्वये मुख्य अभियंत्यांना "मुख्य नियंत्रक

प्राधिकारी" म्हणून जबाबदार धरायला हवे. तरच त्यांच्या हाताखालील सर्व यंत्रणा ते कार्यरत करतील. दोन, खाली दिलेल्या नमुन्यात आदेश काढून कालवा अधिका-यांच्या नियुक्त्या करणे.

**कालवा अधिका-याची नियुक्ती करण्यासाठीच्या आदेशाचा नमूना**

**Order of Appointment of Canal Officers**

With reference to Sec 2 (4) & 6 of Maharashtra Irrigation Act, 1976,

Shri / Shrimati______________________________(*Name*)___, (*Designation*)

is, hereby, appointed as Canal Officer in respect of First Class Irrigation / Second Class Irrigation at _______________(*office*), _______________(*place*) on (*date*) for the purposes of the said Act.

Person so appointed shall perform all duties as specified in following by virtue of post

GR No.10.04/(309/2004)/IM dt 31st Aug 2004.

Duties allotted u/s 10 (Allotment of Duties).

Person so appointed shall exercise all powers as delegated to the person by virtue of post u/s 110 (Delegation of powers) of the said Act.

Person so appointed shall be a Public Servant & as such, provisions u/s 113 of Maharashtra Irrigation Act, 1976 shall be applicable to the said person.

Order issued on behalf of & in the name of Chief Controlling Authority (u/s 7) in irrigation matters

**Date:**

Signature
Name
Designation
Office
Address
Details of the Officer who issued the order

संदर्भ: “प्रकरण-२५: संस्थांत्मक आणि कायदेविषयक व्यवस्था”,पृष्ठे ३०५ ते ३३२, एकात्मिक राज्य जल आराखडा, (महाराष्ट्रातील गोदावरी नदीखोरे) नोव्हेंबर २०१७, खंड-२ (दि. ३०.११.२०१७ रोजी राज्य जल परिषदेने मंजूर केला)

**कायदा अंमलात आणण्यासाठीच्या प्राथमिक बाबी**

- कालवा अधिका-यांना कामाला लावा
- मुख्य अभियंत्यांना जबाबदार धरा.

## परिशिष्ट-२

## नदीनाल्यांचे अधिसूचितीकरण

जलसंपदा विभागाला (जसंवि) नदीनाल्यातील पाण्यावर कायदेशीर अधिकार हवा असेल तर जसंवि ने नदीनाल्यांचे म.पा.अ.७६ मधील कलम क्र.११ अन्वये अधिसूचितीकरण करणे आवश्यक आहे. अन्यथा, त्या नदीनाल्यातल्या पाण्यावर महसूल विभागाचा अधिकार चालू राहतो. प्रकल्प उभारणीचा उद्देश व तपशील जाहीर करणे, समाजाच्या वतीने नदीनाल्यांचे व्यवस्थापन यापुढे जसंवि तर्फे होईल व जसंविचे कायदेकानू लागू होतील याची सर्व संबंधितांना कल्पना देणे आणि आलेल्या हरकतींची तसेच सूचनांची उचित दखल घेणे हे सर्व अधिसूचितीकरणाच्या प्रक्रियेत अपेक्षित असतं. ही प्रक्रिया एकदा व्यवस्थित पार पडली की, म.पा.अ.७६ नुसार खालील बाबी शक्य होतात:

१)अधिसूचित नदीनाल्यातील पाण्यासंदर्भात पाणी वाटप व वापराची मंजुरी देणे,पाणी वापर हक्क देणे, संनियंत्रण व नियमन करणे,पाणीपट्टी आकारणी व वसूली करणे, इत्यादिचे अधिकार जसंवि ला मिळतात.

२) कलम क्र.१२ अन्वये कालवा अधिका-यांना प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील खाजगी जमीनींवर शासकीय कामासाठी जाण्याचे अधिकार प्राप्त होतात.

३) कलम क्र.८० अन्वये नुकसान भरपाईची प्रकरणे जिल्हाधिका-यांपुढे चालतील अशी अधिसूचना जिल्हाधिकारी काढतात.

४)नदीनाल्यातील अतिक्रमण, पाणी चोरी व प्रदूषण याबद्दल कालवा अधिकारी कारवाई करू शकतात. कारण कलम क्र.२(३) अन्वये अधिसूचित नदीनाले म्हणजे कालवा!

५)अधिसूचित नदीनाल्यातील पाणी अन्य प्रकारे / अन्य हेतूंकरता वापरण्यावर बंधने येतात.हेतूतील बदल परत विहित प्रक्रियेद्वारे अधिसूचित करावे लागतात.

नदीनाल्यांचे अधिसूचितीकरण झाले नाही किंवा व्यवस्थित झाले नाही तर वरील बाबी कायद्याने अशक्य होतील.सिंचन प्रकल्पांना विरोध म्हणून, राजकारण म्हणून वा कोणत्याही कारणाने कोणी म.पा.अ.७६ मधील कलम क्र.१२ अन्वये प्रकरण न्यायालयात उपस्थित केले तर कालवा अधिका-यांना प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील खाजगी जमीनींवर पायसुद्धा ठेवता येणार नाही. नदीनाल्यातील अतिक्रमण, पाणी चोरी, प्रदूषण तसेच पाणीपट्टीच्या थकबाकी बद्दल म.पा.अ.७६ अन्वये काहीही करता येणार नाही. शेतीचे पाणी शहरांकडे वळवणे सोपे होईल. पाण्याचे खाजगीकरण करू पाहणा-यांना रान मोकळे सापडेल. विशेष आर्थिक क्षेत्राचा आग्रह धरणा-यांचे फावेल.पाणी वापर संस्थांना जसंवि ने पाणी वापर हक्क देण्याच्या स्वप्नाला वास्तवात काही आधार राहणार नाही. जसंवि ने जे विविध प्रकारचे सिंचन प्रकल्प आजवर उभारले त्यांच्याशी संबंधित सर्व नदीनाले म.पा.अ.७६ नुसार अधिसूचित आहेत का? विविध प्रकारच्या पाणी वापराकरता परवानग्या देताना अधिसूचितीकरणाचे पथ्य जसंवि ने पाळले आहे ना? जसंवि ने जे नदीनाले अधिसूचित केले त्यांच्या संदर्भात संबंधित जिल्हाधिका-यांनी कलम क्र.८० अन्वये नुकसान भरपाई संबंधी अधिसूचना काढल्या का? म.पा.अ.७६ मधील नुकसान भरपाईच्या कलमांचा (कलम क्र.७५ ते ८७) लाभ आजवर किती लाभधारकांना मिळाला? पाणी पुरवठयात खंड पडल्याबद्दल कायद्यात केवळ नुकसान भरपाईचीच तरतूद नाही तर पाणीपट्टीत माफी व महसूल कमी करण्याबद्दलही तरतूदी आहेत! त्या वापरल्या गेल्या? वापरायला

नकोत? ही सर्व कलमे अंमलात आली तर  पाणी पुरवठयात खंड पडण्याचे प्रकार व प्रमाण कमी होईल.कालवा प्रचालनात काही अंशी तरी शिस्त व जबाबदेही येईल. कायद्याची अंमलबजावणी चांगली झाली तर निदान "लाभक्षेत्रातील कोरडवाहूपणा" तरी संपेल.

**नदीनाले अधिसूचित करणे का महत्वाचे आहे?**

- अतिक्रमण, पाणी चोरी, प्रदूषण तसेच पाणीपट्टीच्या थकबाकी बद्दल कारवाई करता येईल
- पर्यायी व्यवस्था न करता शेतीचे पाणी बिगर सिंचनासाठी वळवण्या/ पळवण्यावर बंधने येतील
- नदीनाल्यांचे संभाव्य खाजगीकरणाला रोखण्याकरिता एक संदर्भ प्राप्त होईल

## परिशिष्ट -३

## सिंचन प्रकल्पांच्या लाभक्षेत्राचे अधिसूचितीकरण

सिंचन प्रकल्पांचे लाभक्षेत्र केवळ नकाशांवर दाखवून ते ज.सं.वि.च्या अखत्यारित कायदेशीररित्या येत नाही. त्यासाठी म.पा.अ.७६ मधील कलम क्र. ३ अन्वये प्रवाही,उपसा,पाझर,विहिर अशा विविध प्रकारे सिंचित होणारे लाभक्षेत्र शासकीय राजपत्रात रितसर अधिसूचित करावे लागते. ते झाल्यावर खालील गोष्टी शक्य होतात:

१) ज.सं.वि.चे कायदेकानू व पाणीपट्टी यापुढे लाभक्षेत्राला लागू होणार याची अधिकृत कल्पना लाभधारकांना मिळते. काही म्हणणे असल्यास ते मांडण्याची संधी त्यांना प्राप्त होते.

२) लाभधारकांना व पाणी वापर संस्थांना पाणी हक्कांसंदर्भात एक महत्वाचा कायदेशीर आधार मिळतो.

३) पाणी अर्ज मंजूरी; पाणी वाटप व नियमन; पाणीपट्टी आकारणी व वसूली; सिंचन गुन्ह्यांबाबत कारवाई अशा एकूण सिंचन प्रक्रिये संदर्भात ज.सं.वि.स अधिकार मिळतात.

४) लाभक्षेत्रावरचे अतिक्रमण हटवता येते.

५) लाभक्षेत्रातील जमीनींचा शेतीव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी होणारा नियमबाह्य वापर थांबवता येतो.

६) अधिसूचित करून कायदेशीर ताबा प्राप्त झालेले लाभक्षेत्र ज.सं.वि. पाणी वापर संस्थांना व्यवस्थापनासाठी हस्तांतरित करू शकतो.

७) इतरही काही महत्वाचे खालील अधिकार ज.सं.वि.स प्राप्त होतात:

- पाणी उपलब्ध असताना वापरले नाही तर "किमान-पाणीपट्टी"लावणे (कलम क्र.४६(३))
- पाणी टंचाईच्या काळात नगदी पिकांवर बंधने आणणे (कलम क्र. ४७,४८)
- थकबाकीदारांकडून प्रसंगी सक्तीच्या मार्गाने पाणीपट्टी वसूल करणे(कलम क्र.८८(२))
- लाभक्षेत्रातील विहिरींवर आकारणी करणे(कलम क्र.५५,५६,१०५)

थोडक्यात, लाभक्षेत्राच्या अधिसूचितीकरणामूळे एकूण सिंचन व्यवहारास कायद्याचे अधिष्ठान प्राप्त होते.लाभक्षेत्रात असूनही "कोरडवाहू" राहिलेल्यांना समन्यायी पाणी वाटपाच्या लढाईसाठी एक आवश्यक हत्यार मिळते.अधिसूचितीकरण झाले नाही किंवा योग्य प्रकारे झाले नाही तर वरील गोष्टी अर्थातच होणार नाहीत.लाभक्षेत्रातील ज.सं.वि.च्या कोणत्याही कारवाईस आव्हान दिले जाईल. पाणी वापर संस्थांना केलेले लाभक्षेत्राचे हस्तांतरणही अवैध ठरेल. लाभक्षेत्रात आजच मोठया प्रमाणावर भूखंड पडता आहेत व वसाहती उभ्या राहता आहेत. जमीनी परस्पर अ-कृषी (एन ए) केल्या जात आहेत. हे का होत आहे? कसे रोखणार ते? शक्यता अशी आहे की, अनेक सिंचन प्रकल्पात लाभक्षेत्राचे अधिसूचितीकरण झालेले नाही. जेथे झाले आहे तेथे फक्त प्रवाही सिंचनाचे झाले आहे. उपसा सिंचनाचे नाही. प्रवाही विरूद्ध उपसा सिंचन या संघर्षात त्यामूळे उद्या प्रवाही सिंचनवाले मरणार आहेत.

**यासाठी आवश्यक आहे लाभक्षेत्राचे अधिसूचितीकरण:**

सिंचन व्यवहारास कायद्याचे अधिष्ठान प्राप्त होईल. समन्यायी पाणी वाटपाच्या लढाईसाठी एक आवश्यक हत्यार मिळेल. लाभक्षेत्रातील शेत जमीनी एन ए करायला आळा घालता येईल. प्रवाही सिंचनाचे हितसंबंध जपायला मदत होईल. शेतीचे पाणी बिगर सिंचनासाठी वळवण्या/ पळवण्यावर बंधने येतील

## परिशिष्ट-४

## मपाअ ७६ आणि महसूल विभागाची जबाबदारी

महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम,१९७६ [मपाअ ७६] मधील काही तरतुदींमूळे सिंचन प्रकल्पांच्या जल व्यवस्थापनाबाबत महसूल विभागानेही काही जबाबदारी पार पाडणे अपेक्षित आहे. फारशा चर्चेत व अंमलात नसलेल्या त्या बाबींचा तपशील खालील प्रमाणे

१. सिंचन प्रकल्पांशी संबंधित नदीनाल्यांचे अधिसूचितीकरण (कलम ११) जल संपदा विभागाने केले असेल तर नदीनाल्यातील पाण्यावर कायदेशीर अधिकार व म्हणून जल व्यवस्थापनाची सर्व जबाबदारी त्या विभागाची असते. जल संपदा विभागाने तशी अधिसूचना काढली नसल्यास मात्र नदीनाल्यातील पाण्यावर कायदेशीर अधिकार व म्हणून जल व्यवस्थापनाची सर्व जबाबदारी महसूल विभागाकडे राहते. कन्हान नदीसंदर्भात १९८४ साली वाद निर्माण असताना विधि व न्याय विभागाने वर नमुद केल्याप्रमाणे अभिप्राय दिला होता. परळी औष्णिक वीज केंद्राच्या थकित पाणीपट्टी संदर्भातही १९८७ साली शासनाने अशीच भूमिका घेतली होती.

२. सिंचन प्रकल्पांच्या लाभक्षेत्राचे अधिसूचितीकरण (कलम ३) करण्याची मूळ जबाबदारी जल संपदा विभागाची आहे पण अ-कृषिकरण (एन.ए.) संदर्भात महसूल विभागाचा संबंध येतो. अधिसूचित लाभक्षेत्रात जल संपदा विभागाला कल्पना न देता जमिनी एन. ए. करणे योग्य नाही. तसे होत असल्यास जल संपदा विभागाने त्यांस आक्षेप घेतला पाहिजे. अन्यथा, सिंचन प्रकल्पासाठी झालेली गुंतवणुक वाया जाईल. लाभक्षेत्रातील एन.ए. झालेली जमीन फार मोठी असण्याची शक्यता आहे.

३. सिंचन व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करण्या संदर्भात पाटबंधारे क्षेत्र, कालवा अधिकारी,त्याचा कार्यभार व अधिकार वगैरे बाबत सुस्पष्ट तरतुदी कलम ५ ते १० मध्ये आहेत. कलम ११७ ते १३० ची अंमलबजावणी करण्यासाठी कालवा अधिकारी हा महसूल अधिकारी (किमान तहसीलदार) असेल असे कलम ६ (२) मध्ये स्पष्ट म्हटले आहे.

४. मपाअ ७६ अन्वये पाटबंधारे विषयक बांधकामांची "पहिल्या" आणि "दुस-या" वर्गाची बांधकामे अशी वर्गवारी करण्यात आली आहे. कलम २ (२१) अन्वये दुस-या वर्गाच्या पाटबंधारे विषयक बांधकामांची व्याख्या पुढील प्रमाणे आहे. " दुस-या वर्गाची पाटबंधारे विषयक बांधकामे" याचा अर्थ, मुंबई पाटबंधारे अधिनियम १८७९अन्वये या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी दुस-या वर्गाची पाटबंधारे विषयक बांधकामे म्हणून घोषित करण्यात आलेले कालवे, कालवा-प्रणाली, ओढे, नद्या, विहिरी, नलिकाकूप,आर्टेशियन विहिरी, जलवाहिन्या, कृत्रिम किंवा नैसर्गिक जलाशय किंवा बंधारे किंवा त्यांचा कोणताही भाग, असा आहे. पहिल्या

वर्गाच्या पाटबंधारे विषयक बांधकामांची स्वतंत्र व्याख्या कायद्यात नाही. त्यामूळे जी कामे वरील व्याख्येत बसत नाहीत अशी कामे पहिल्या वर्गात येतात असे म्हणता येईल.

५. कलम १ ते ११६ अन्वये पहिल्या वर्गाच्या पाटबंधारे विषयक बांधकामांची जबाबदारी जल संपदा विभागाची तर कलम ११७ ते १३० अन्वये दुस-या वर्गाच्या पाटबंधारे विषयक बांधकामांची जबाबदारी महसूल विभागाची आहे.

६. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम १७६ अन्वये सक्तीच्या मार्गाने पाणीपट्टीची थकबाकी वसूल करणे याबाबत (कलम ८८) मूळ जबाबदारी महसूल विभागाची आहे असे पूर्वी मानण्यात येत होते पण एका शासन निर्णयानुसार (संकीर्ण १०.०/(८७/२००१)/सिं.व्य.(धो) दि.३१ मार्च २००३, परिच्छेद क्र.१७) जल संपदा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना याबाबत जिल्हाधिका-यांच्या समकक्ष अधिकार देण्यात आले आहेत. उपरोक्त शासन निर्णयात जिल्हा परिषदेकरिता लावण्यात आलेल्या पाणीपट्टी वरील स्थानिक उपकरासंबंधी ‘जमीन महसूल वसूली प्रमाणपत्र’ जिल्हाधिका-यांकडे पाठवावे असेही म्हटले आहे.

७. ज्याच्या सहाय्याने कालव्यांचे पाणी अनधिकृतरित्या वापरण्यात येते अशा यंत्राच्या व उपकरण संचाच्या बाबतीतील मूळ जबाबदारी - उदाहरणार्थ, मोटारी जप्त करणे - (कलम ५१ व ९७) जल संपदा विभागाची आहे. पण प्रत्यक्ष कारवाई मात्र महसूल विभागाच्या पुढाकाराने व त्याच्या नेतृत्वाखाली होताना दिसते.

८. पाणी पुरवठयात खंड पडल्याबद्दल नुकसान भरपाईची सुनावणी कलम क्र.७८ अन्वये जिल्हाधिका-यांनी करणे अपेक्षित आहे. त्याकरिता जिल्हाधिका-यांनी कलम ८० अन्वये नोटीस काढायला हवी.नुकसान भरपाई द्यावी लागायला लागली तर कदाचित जल संपदा विभाग जास्त काळजीपूर्वक जल व्यवस्थापन करायला लागेल.

## परिशिष्ट-५

## सिंचन विषयक कायद्यांची अंमलबजावणी झाली तर काय होऊ शकते?

आज जे काही व जसे कायदे आहेत - त्यांच्या मर्यादांचे भान ठेऊनही - त्यांची किमान अंमलबजावणी झाली तरी जलक्षेत्रात फार मोठे बदल होतील. ते बदल संभाव्यत: काय असू शकतात याची काही उदाहरणे येथे दिली आहेत. गृहित अर्थातच हे आहे की, विविध कायद्यांचे नियम व अधिसूचना उपलब्ध असतील आणि कालवा अधिका-यांना कार्यरत केले जाईल. हे होणे अर्थातच सोपे नाही पण त्याशिवाय पुढे काहीच होणार नाही. म्हणून प्रस्तुत लेखकाने राज्य जल परिषदेच्या पहिल्याच बैठकीत हा मुद्दा उपस्थित केला होता. तत्कालिन मुख्यमंत्र्यांनी तो उचलुन धरला आणि या सर्व बाबींची समयबद्ध पद्धतीने पूर्तता करण्यासाठी एक टास्क फोर्स स्थापन करा आदेश दिला. तो टास्क फोर्स नेमला गेला नाही!

**पाणीचोरी आणि अन्य सिंचन गुन्हे रोखणे:**

पाणी चोरी, पाणी नाश आणि कालव्यांची तोडफोड या तीन सार्वत्रिक व गंभीर बाबींमूळे जल सुशासन, नियमन व व्यवस्थापन आज अशक्य होऊन बसले आहे. पण म.पा.अ.७६ मध्ये पाणीचोरी आणि अन्य सिंचन गुन्हे रोखण्यासाठी असलेल्या खालील भरीव तरतुदींचा उपयोग केला तर जलक्षेत्रात किमान शिस्त निर्माण व्हायला मदत होईल. (कंसातील आकडे म.पा.अ.७६ मधील कलम क्र. दर्शवतात)

१) लाभक्षेत्रातील पाण्याच्या निच-यास होणारे अडथळे दूर करणे (१९,२०,२१). कालवा अधिका-यांचा निर्णय अंतिम मानला जाईल. त्या विरूद्ध दिवाणी न्यायालयातसुद्धा जाता येणार नाही

२) पाणी पुरवठा बंद करण्याचा अधिकार(४९)

३) पाणी चोरीबद्दल सामुदायिक दंड (५२)

४) पाणी नाशाबद्दल सामुदायिक दंड (५३)

५) दंडासह पाणीपट्टी वसूल करणे (५४)

६) कालवा नुकसानीच्या दुरुस्तीच्या खर्चाची सामुदायिक वसूली (१०८)

७) अपराध सिद्ध झाल्यास कारावास, दंड अथवा दोन्ही शिक्षा (९३,९४). या कलमांखालील शिक्षापात्र अपराध कलम ९८ अन्वये दखलपात्र व जामीनपात्र आहेत.

८) अपराध्यास वारंटाशिवाय अभिरक्षेत (कस्टडीत) घेता येणे (९६)

९) ज्या साधनाने पाणी चोरी होत असेल ते साधन जप्त करणे व वीज पुरवठा खंडित करण्याचा आदेश कालवा अधिका-याने देणे व तो आदेश वीज पुरवठा करणा-यांवर बंधनकारक असणे(९७)

**उपसा सिंचनाचे नियंत्रण व नियमन करणे:**

म.पा.अ.७६ मध्ये उपसा सिंचनाबद्दल फारशा तरतुदी नसणं आणि ज्या आहेत त्यांची (कलम क्र. ३,८,११,११६) अंमलबजावणी न होणं हे एक (एकमेव नव्हे!) महत्वाचं कारण आहे. म.पा.अ.७६ मध्ये सुधारणा करून उपसा सिंचनाबद्दल सूस्पष्ट व पुरेशा तरतुदी करणं आणि त्या अंमलात आणणं हा एक (एकमेव नव्हे!) उपाय होऊ

शकतो. पाणी वापर संस्थांसाठीच्या २००५ सालच्या कायद्यातील कलमं ३९ ते ५१ या आधारे आता उपशाचं जास्त चांगलं नियमन शक्य आहे. म.ज.नि.प्रा. कायद्यातील कलमं ११ ते १४ व २२ ही याबाबत उपयोगी पडू शकतात. उपसा सिंचनासाठी मंजूरी देण्याबाबतचा २१/११/२००२ च्या शासन निर्णयाची मदत होऊ शकते.उपसा सिंचनाकरता नवीन कायद्या आधारे पाणी वापर संस्था स्थापन करणं; त्या संस्थांना प्रकल्पस्तरीय संस्थेचा अविभाज्य भाग मानणं; इतर पाणी वापरकर्त्यांनी - विशेषत: प्रवाही सिंचनाच्या पाणी वापर संस्थांनी उपसावाल्यांवर सामाजिक दबाव आणणं; उपसाचं क्षेत्र अधिसूचित होणं आणि उपसाचं पाणी मोजलं जाणं हे खरं तर जास्त प्रभावी उपाय आहेत.

**उसाचे क्षेत्र मर्यादित करणे:**

आज महाराष्ट्राला - विशेषत: दुष्काळी भागाला - उसबाधा झाली आहे. राज्यातल्या एकूण उसापैकी सरासरी ५५% उस सिंचन प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात उभा असतो. धरणातील ७०% पाणी उसाकरिता वापरले जात आहे. दुष्काळ पडण्याचे हे एक प्रमुख कारण आहे. सिंचन प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात कायद्याने उसासारख्या जास्त पाणी लागणा-या पिकांवर पाणी टंचाईच्या काळात शासन बंधने घालू शकते. महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ अन्वये खालील कलमांनुसार हे शक्य आहे

- पाणी टंचाईच्या कालावधीत पिकांचे नियमन करणे(४७)
- लाभक्षेत्रातील विहिरींवरील नगदी पिकांच्या क्षेत्रावर निर्बंध घालणे (४८)
- कलम क्र. ४७ व ४८ अन्वये लागू केलेल्या निर्बंधांचे उल्लंघन झाल्यास पाणी पुरवठा बंद करणे (४९)

ही कलमे प्रथमपासून अंमलात आणली असती तर आज राज्यात वेगळी पिकरचना दिसली असती. दुर्दैवाने, कायदा झाल्यापासून गेल्या चाळीस वर्षात ही कलमे वापरलीच गेली नाहीत.

**संदर्भ:**


१ महाराष्ट्र जल व सिंचन आयोग, १९९९

२ महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ चे नियम बनविण्यासाठीची (भिंगारे) समिती, २००२

३ महाराष्ट्र राज्य जलनीती,२००३

४ महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प,२००५

५ महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतक-यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ आणि नियम, २००६

६ महाराष्ट्र जल संपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५

७ Precise Determination of reservoir Releases During Emergency Situations In The State of Maharashtra by Technical Committee, May 2007 (वडनेरे समिती)

८ महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम,२००९

९ जलक्षेत्रात कायद्याचे राज्य व वाल्मीची पुनर्रचना" अभियानांतर्गत प्रदीप पुरंदरे यांचे उपोषण, १ व २ जून २०१०

१० Letter to The Secretary (WRP & Devp), WRD regarding withdrawal of Water Audit Report, 16 Aug 2011

११ महाराष्ट्र राज्य जलनीती,२०११ (सुधारणा)

१२ राज्यातील सिंचनाची प्रगती व भविष्यातील वाटचाल, श्वेत पत्रिका, नोव्हेंबर २०१२

१३ महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल, ऑक्टोबर २०१३ (केळकर समिती)

१४ सिंचन विषयक विशेष समितीचा अहवाल, फेब्रुवारी २०१४ (चितळे समिती)

१५ सिंचन विषयक विशेष समितीच्या अहवालावरील कार्यपालन अहवाल, जून २०१४

१६ एकात्मिक राज्य जल आराखडा तयार करण्यासंदर्भात बॉम्बे उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात प्रा. प्रदीप पुरंदरे यांनी दाखल केलेली जन हित याचिका क्र १२४/२०१४

१७ महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम,१९७६ चे नियम तयार करण्यासंदर्भात बॉम्बे उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात प्रा. प्रदीप पुरंदरे यांनी दाखल केलेली जनहित याचिका क्र १५२/२०१४

१८ "प्रकरण-२५: संस्थांत्मक आणि कायदेविषयक व्यवस्था",पृष्ठे ३०५ ते ३३२, एकात्मिक राज्य जल आराखडा, (महाराष्ट्रातील गोदावरी नदीखोरे) नोव्हेंबर २०१७, खंड-२ (दि. ३०.११.२०१७ रोजी राज्य जल परिषदेने मंजूर केला)

१९ "प्रकरण-२५: संस्थांत्मक आणि कायदेविषयक व्यवस्था",पृष्ठे ४५० ते ४६३, महाराष्ट्र राज्याचा एकात्मिक राज्य जल आराखडा, सप्टेंबर २०१८, खंड-१ (दि. ११.२.२०१९ रोजी राज्य जल परिषदेने मंजूर केला)

२० महाराष्ट्र राज्याचा एकात्मिक राज्य जल आराखडा, सप्टेंबर २०१८

२१ महाराष्ट्र राज्य जलनीती, २०१९

२२ Submission by Pradeep Purandare to the Committee for drafting National Water Policy, 27 Jan 2020 (मिहिर शहा समिती)

२३ Report on Floods 2019 (Krishna Sub Basin), Flood Study Committee, May 2020 (वडनेरे समिती)

२४ महापूर २०२१- महाड, चिपळूण आणि कोल्हापूर, पूरग्रस्त भागाच्या दौ-याचा अहवाल, ऑगस्ट २०२१